# विद्यापीठाशी संलग्नित २९३ महाविद्यालयात योग

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कणेरी मठाचे मुप्पीन काडसिद्धेश्वर स्वामी यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, प्रा. भारत खराटे, डॉ. संदीप पाटील आदींच्या हस्ते रोपट्यास पाणी वाहून योगदिन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह विविध अधिविभागाचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासह शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी आणि समाजातील आबालवृद्धांनी योग दिन प्रशिक्षणात सहभाग घेतला. मठाचे प्रशिक्षक सूरज पाटील यांनी योग प्रशिक्षण दिले.

अमित गद्रे



शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहात आयोजित योगशिबिरात महिलांसह विद्यार्थ्यांनीही ध्यानधारणा केली.



योग शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांनी योगाचे धडे घेतले.

# शिवाजी विद्यापीठ 'योग'मय

## महाराष्ट्र टाइम्स, शिवाजी विद्यापीठ, सिद्धगिरी मठातर्फे योग शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि सिद्धगिरी मठाचे मुपीन काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या हस्ते वडाच्या रोपट्यास पाणी घालून योग शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित डावीकडून डॉ. संदीप पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, सूरज पाटील, डॉ. भरत खराटे, गौतम नागपूरकर, आदी.

**कोल्हापूर टाइम्स टीम**

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र टाइम्स, शिवाजी विद्यापीठ व सिद्धगिरी मठाच्या वतीने शुक्रवारी सकाळी आयोजित केलेल्या योग शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेकडो अबालवृद्धांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहात हे शिबिर पार पडले. शिबिरामुळे शिवाजी विद्यापीठातील वातावरण 'योग'मय बनले होते. योग शिबिरासाठी चाटे शिक्षण समूह व नागपूरकर हिअरिंग सर्व्हिसेस हे प्रायोजक होते.

सध्याच्या जीवनशैलीत सर्वच वयोगटातील व्यक्तींना मानसिक आणि शारीरिक ताणतणावांना सामारे जावे लागते. यामुळे आरोग्य जपण्याकडे कल वाढत आहे. दगदगीच्या जीवनातही लोकांना योगाच्या माध्यमातून आरोग्य जपण्याचे धडे मिळत आहेत. हीच बाब लक्षात घेऊन जागतिक योग दिनाच्या निमत्ताने महाराष्ट्र टाइम्स, शिवाजी विद्यापीठ आणि सिद्धगिरी मठ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग शिबिराचे आयोजन केले होते. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहात शुक्रवारी सकाळी साडेसहाला या शिबिरास सुरुवात झाली. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि सिद्धगिरी मठाचे मुपीन काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या हस्ते वडाच्या रोपट्यास पाणी घालून शिबिराचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग व योग साधकांनी तुळशीचे रोप देऊन उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर सिद्धगिरी मठातील योग शिक्षक सूरज पाटील यांनी योगाचे महत्त्व पटवून देत योगाची प्रात्यक्षिके करवून घेतली.



शालेय विद्यार्थ्यांनी योग शिबिरात सहभाग घेऊन योगाची प्रात्यक्षिके केली.



विद्यापीठातील प्राध्यापक व अधिकाऱ्यांसह यंग सीनिअर्सनीही शिबिरात योगाची प्रात्यक्षिके केली.

**जागतिक योग दिन विशेष**

अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने इराण, इराक व मोझांबिक या देशांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनीही योग शिबिरात सहभाग घेऊन योगाची प्रात्यक्षिके केली. योगाची शास्त्रीय माहिती मिळाल्याने अनेकांनी या शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले. याशिवाय नियमित योगसाधना केल्याने होणारे शारीरिक आणि मानसिक फायदेही त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे या शिबिरात पाच वर्षांच्या लहान मुलांपासून ते ८० वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांनीही योग शिबिरात उपस्थिती लावली. जागतिक योग दिनाच्या निमित्ताने अवघे विद्यापीठ योगमय झाल्याचा अनुभव आला.


योगाच्या प्रात्यक्षिकांनंतर नियमित योगा करणारे वयोवृद्ध योगसाधक चंद्रकांत मेहता, सुगंधा पाटील, आदींचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. शिर्के व मुपीन काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या हस्ते उपस्थित योगसाधकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यापीठातील कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, चाटे शिक्षण समुहाचे संचालक डॉ. भरत खराटे, नागपूरकर हिअरिंग सर्व्हिसेसचे, विजय नागपूरकर, गौतम नागपूरकर, आदी उपस्थित होते. वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूल व लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी योग शिबिरात सहभाग घेतला. योग शिक्षक सूरज पाटील यांनी प्रार्थनेने शिबिराचा समारोप केला.

### परदेशी विद्यार्थ्यांनाही योगाचे आकर्षण

योग शिबिरात परदेशी विद्यार्थ्यांनीही आवर्जून सहभाग घेतला. योग शिक्षकांकडून मिळणाऱ्या सूचना आणि व्यासपीठावरील योग साधकांचे अनुकरण करीत त्यांनी पहिल्यांदाच योगासने केली. योगाविषयी खूप ऐकले होते. मात्र, योगासने करण्याची संधी पहिल्यांदाच मिळाल्याचे त्यांनी सांगितले. योगासनांमुळे मन आणि शरीरावरील तणाव हलका झाल्याचीही भावना त्यांनी व्यक्त केली.



शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहात नियमित योगसाधाना करणारे योगसाधक.



योग शिबिरात स्थानिकांसह परदेशी विद्यार्थीही सहभागी झाले होते.

# भ्रष्टाचाराविरोधात ठणकावून लढा द्यावा

## दमानिया : शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाची संघर्षमय यशस्वी वाटचाल 'शिवज्योत' पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २१ : भ्रष्टाचाराविरोधात लढा ठणकावून प्राण असेपर्यंत द्यायला हवा. चुकीला चूक म्हणायची हिंमत ठेवा. कामगार कायदे बदलले आहेत, त्याविरोधात लढा देण्यास सज्ज व्हा, असे आवाहन भ्रष्टाचार विरोधी चळवळीच्या कृतिशील नेत्या अंजली दमानिया यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम लिखित शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाची संघर्षमय यशस्वी वाटचाल 'शिवज्योत' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी वसंतराव मगदूम, कांचन मगदूम यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

### दोघांचा रक्तगट एकच

शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांचा मगदूम यांनी व्यासपीठावर बोलावून सत्कार केला. त्यांच्या कार्याची माहिती दमानिया यांना दिली. तसेच तात्विक मतभेद असले तरी आम्हा दोघांचा रक्तगट एकच आहे, असे मगदूम यांनी सांगताच सावंत भावूक झाले.

दमानिया म्हणाल्या, 'आदमी पक्षाची मी महाराष्ट्र अध्यक्ष होते. पक्षात काही गोष्टी खटकायला लागल्यानंतर पक्षातून एक पाऊल मागे घेतला. आम्ही राजकारण बदलायला आलो होतो. आमचा भ्रमनिरास झाला. कोणताही पॉलिटिकल सपोर्ट आम्हाला नाही. तत्त्व व सिद्धांतावर जगल्यास मान मिळतो. त्याचा खूप त्रासही होतो. राजकीय क्षेत्रातील दिग्गजांच्याविरोधात मी लढली आहे. माझ्या विरोधात वेगवेगळ्या कोर्टात ३२ बदनामीचे खटले दाखल होते. काम स्वच्छ असल्यास माणसांची साथ हमखास मिळते. त्यामुळेच ३२ पैकी २१ माझ्या विरोधातील खटल्यांना स्थगिती मिळाली.''


प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'श्री. मगदूम यांची मांडणी अभ्यासू असते. ती त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या आंदोलनातून जाणवली आहे. त्यांनी १०३ कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी दिलेला धडा महत्त्वपूर्ण असून, त्याचा उल्लेख विद्यापीठाचा लिहित असलेल्या इतिहासात नक्की असेल.'



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम व कांचन मगदूम यांचा मानपत्र देऊन सत्कार करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी भ्रष्टाचारविरोधी चळवळीतील कृतिशील नेत्या अंजली दमानिया, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, सुनील देसाई, नारायण पोवार.**

मगदूम म्हणाले, '१०३ कर्मचाऱ्यांचा प्रश्न महत्त्वाचा होता. लेबर ते सुप्रीम कोर्टापर्यंत सर्व दाव्यांत आम्ही यशस्वी झालो आहोत. जर एखादा प्रश्न विद्यापीठात सुटत असेल तर कर्मचाऱ्यांना न्यायालयात जाण्याची वेळ येऊ देऊ नये, याची प्रशासनाने काळजी घ्यावी.''

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळांचे संचालक महेश काकडे, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे जिल्हाध्यक्ष नारायण पोवार उपस्थित होते. मनोहर कुलकर्णी यांनी मानपत्राचे वाचन केले. संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी प्रास्ताविक केले.




नियमित योगासने करणाऱ्या योग साधकांसाठी शिवाजी विद्यापीठाने जागेची उपलब्धता करून दिली आहे. मटा आणि सिद्धगिरी मठासोबत एकत्र योग शिबिर घेण्याचा योग आनंददायी आहे.

– डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



जागतिक योगदिनाच्या निमित्ताने भारतातील प्राचीन योगविद्येचा जगभर प्रसार होत आहे. महाराष्ट्र टाइम्स आणि शिवाजी विद्यापीठासोबत योग शिबिरात योगासने करण्याची संधी मिळाली.

– मुपीन काडसिद्धेश्वर स्वामी, सिद्धगिरी मठ, कणेरी



उपक्रम स्तुत्य आहे. धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्य सांभाळण्यासाठी योगाचे महत्त्व जगाने मान्य केले आहे. महाराष्ट्र टाइम्स व शिवाजी विद्यापीठाच्या उपक्रमामुळे योगाचे नेमके मार्गदर्शन मिळाले.

– डॉ. भरत खराटे, संचालक, चाटे शिक्षण समूह



योग शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला. शिबिरामुळे सर्वांना योगाची नेमकी माहिती मिळाली. मटासोबत योगदिनाच्या निमित्ताने मिळालेली ऊर्जा खूप सकारात्मक आहे.

– गौतम नागपूरकर, संचालक, नागपूरकर हिअरिंग सर्व्हिसेस



योगाबद्दल आजवर खूप ऐकले होते. आज प्रत्यक्ष योगासने करण्याची संधी मिळाली. योगामुळे मन उल्हासित झाल्याचा अनुभव आला. एकाचवेळी विविध वयोगटातील लोकांसोबत योगासने करण्याचा अनुभव अविस्मरणीय आहे.

– बुबॅकर बाल्दे, विद्यार्थी, मोझांबिक



योगासनांमुळे शरीर आणि मनाची सांगड घालता येते. आजार उद्भवल्यानंतर उपचार करण्यापेक्षा आजार होऊच नयेत यासाठी योगाची मदत होते. योग शिबिरामुळे आमचा उत्साह आणखी वाढला. यापुढे नियमित योग करू.

– निवास माने, व्यावसायिक



मार्केटिंग मॅनेजरच्या नोकरीमुळे रोजच प्रवास करवा लागतो. योगासनांमुळे आता प्रवासाचा थकवा जाणवत नाही. महाराष्ट्र टाइम्सने आयोजित केलेल्या योगशिबिरात अबालवृद्धांचा योगउत्साह अनुभवायला मिळाला.

– महेश कबाडे, नोकरदार



गेली दोन वर्षे मी नियमित योगासने करतो. योगदिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना सर्वांसोबत योगासने करण्याची संधी मिळाली. हा अनुभव खूपच छान होता. प्रशिक्षकांमुळे योगासनांचे महत्त्वही समजले.

– अर्पित देसाई, विद्यार्थी

# प्रत्येकाने भ्रष्टाचाराविरुद्ध लढले पाहिजे

## भ्रष्टाचारविरोधी चळवळीच्या नेत्या अंजली दमानिया यांचे आवाहन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जबाबदारी कोणा एका व्यक्तीची नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने किमान एका ठिकाणी तरी अशा प्रवृत्तीविरोधात लढा द्यायला हवा, असे आवाहन भ्रष्टाचारविरोधी चळवळीच्या कृतिशील नेत्या अंजली दमानिया यांनी केले. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम लिखित 'शिवज्योत' पुस्तकाचा प्रकाशन समारंभ व वसंतराव मगदूम यांचा अमृतमहोत्सवानिमित्त गौरव अशा संयुक्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

दमानिया म्हणाल्या, तत्त्व आणि सिद्धांतावर चालल्यानंतर समाजात नक्कीच मान मिळतो. चांगले काम करत असताना चांगले लोकही आपल्यासोबत आपोआपच जोडले जातात. आपण सर्वांनी चुकीला चूक म्हणण्याची हिंमत ठेवली पाहिजे.

वसंतराव मगदूम म्हणाले, मोठ्या धाडसाने ही संघटना उभी केली आहे. तिच्या माध्यमातून लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. जे प्रश्न विद्यापीठ प्रशासनाकडून सोडवले जाऊ शकतात त्यासाठी न्यायालयात का जावे लागते, असा प्रश्न नेहमी मनात येतो.

### चांगल्या उमेदवारासाठी दबाव आणा

एखाद्या व्यक्तीला पंतप्रधान करण्यासाठी स्थानिक पातळीवर चुकीची व्यक्ती निवडली जाऊ नये, याची खबरदारी आपण सर्वांनी घ्यायला हवी. यापुढे चांगल्या उमेदवारासाठी लोकांनी एकत्र येत राजकीय पक्षांवर दबाव आणण्याची गरज आहे. त्यासाठी येत्या विधानसभा निवडणुकीत पक्षांना पोस्टकार्डद्वारे पत्र पाठवून चांगला उमेदवार देण्याचे आवाहन करण्यासाठी चळवळ सुरू करणार आहोत. त्यामध्ये कोल्हापूरच्या नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अंजली दमानिया यांनी केले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम यांना मानपत्र देऊन गौरविताना मान्यवर. (छाया : पांडुरंग पाटील)


प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के म्हणाले, वसंतराव मगदूम यांचा अभ्यास हा प्रत्येकाला भावणारा असाच आहे. कार्यालयात येताना ते नेहमी हातात कागद घेऊन येत आणि आपला मुद्दा ठणकावून समोरच्याला पटवून देत. सध्या विद्यापीठाचा इतिहास लिहिण्याचे काम सुरू आहे. त्यामध्ये मगदूम यांचा ठळकपणे उल्लेख असेल.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, नारायण पोवार यांच्यासह सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी केले, तर आभार रेहाना मुरसल यांनी मानले.

महाराष्ट्र टाइम्स
PLANET CAMPUS
उज्ज्वल भविष्यासाठी

# अमर्याद संधींचा राजमार्ग : नॅनोसायन्स

प्रा. प्रमोद कसबे



नॅनोसायन्स आणि त्यावर आधारलेले नॅनो तंत्रज्ञान यामुळे भविष्यात अनेक नवनवीन स्वप्नवत तसेच आश्चर्यकारक गोष्टींची अनुभूती अवघ्या जगाला होणार आहे. या तंत्रज्ञानावर आधरित अनेक पदार्थ आणि वस्तूंनी आपल्या दैनंदिन जीवनात हल्ली अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त केलेले आहे. यामध्ये अनेकविध गृहोपयोगी साधने, सौंदर्यप्रसाधने, कपडे, उपकरणे, इत्यादी अनेक बाबींचा समावेश आहे. छोट्या बॅगेत किंवा खिशातही मावेल असा संगणक, स्मार्टफोन, आरोग्यासंबधी तक्रारीचा शोध, मापन व व्यवस्थापन करू शकणारी स्वयंचलित उपकरणे तसेच त्यावर आधरित उपचार अशा गोष्टींच्या निर्मितीमध्ये भविष्यात नॅनोतंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याने त्याला सद्यस्थितीला तंत्रज्ञानाचा अत्याधुनिक टप्पा म्हणून गणले जात आहे. मानवाच्या मुलभूत गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षणही याच तंत्रज्ञानावर आधारित रोजगार निर्मिती यावर भर दिला जात आहे. म्हणूनच अनेक विकसनशील तसेच विकसित देशांतही नॅनोतंत्रज्ञानाचं शिक्षण, संशोधन आणि त्यावर आधारित रोजगार निर्मिती यावर भर दिला जात आहे. नॅनोतंत्रज्ञानाच्या बहुआयामी विकासासाठी आशिया, अमेरिका, युरोप यांसह जगातल्या जवळजवळ सर्वच देशांनी आपली कंबर कसली आहे. त्यामुळे येणारं युग हे नॅनोतंत्रज्ञानाचंच असणार यात दुमत नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षी तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार आणि प्रा. पी. एस. पाटील यांच्या दूरदृष्टीयुक्त प्रयत्नांतून विद्यापीठात, 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' या अधिविभागाची सुरूवात शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून करण्यात आली. या अधिविभागात बी. एस्सी.-एम. एस्सी. (एकत्रित) अभ्यासक्रमात शिकून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पुढे अधिविभागाचा तसेच विद्यापीठाचा नावलौकिक राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रस्थापित केला आहे. नॅनोसायन्ससारख्या कालानुरूप विषय, त्यावर आधारित संशोधन आणि तंत्रज्ञान या गोष्टींवर सातत्याने भर दिला जात असल्याने येथील अत्याधुनिक शिक्षण हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे सक्षम असल्याची ग्वाही या विभागाच्या स्थापनेपासूनच्या अर्थात मागील सात वर्षांच्या प्रगतीने दिली आहे.

'स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' या अधिविभागात शिकवल्या जात असलेल्या बी. एस्सी.-एम. एस्सी. (एकत्रित) अभ्यासक्रमास प्रचंड लोकप्रियता प्राप्त झालेली असून या शिक्षणासाठी राज्य तथा देशातल्या विविध ठिकाणाहून इथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय ठरत आहे. सदर अभ्यासक्रमासाठी एकूण प्रवेश क्षमता ही ६० इतकी असून इयत्ता बारावी सायन्स उत्तार्ण विद्यार्थ्यांना छानणी परीक्षेच्या माध्यमातून प्रवेश दिला जातो. या छानणी परीक्षेसाठी पात्र असण्यासाठी खुल्या प्रवर्गतील विद्यार्थ्यांना कमीत कमी ४५ टक्के तसेच राखीव प्रवर्गतील विद्यार्थ्यांना कमीत कमी ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे. इयत्ता बारावीमधून गणित किंवा जीवशास्त्र अथवा दोन्हीही विषयांच्या ग्रुपसह उत्तीर्ण विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी पात्र आहेत. त्याचबरोबर बी. एस्सी. पदार्थविज्ञान अथवा रसायनशास्त्र उत्तीर्ण विद्यार्थी एम. एस्सी. छानणी परिक्षेमार्फत थेट एम. एस्सी. मध्ये प्रवेश घेण्यास पात्र आहे. याच अधिविभागात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पी.एच.डी. पदवीचे शिक्षणही सुरू करण्यात आले आहे.

'स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' या अधिविभागात अत्याधुनिक यंत्रणाकृत वर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा तसेच संगणकसुविधात तज्ञ व अनुभवी प्राध्यापक यासोबतच आंतराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधाही उपलब्ध आहेत. या सुविधांबरोबरच अधिविभागाने अनेक ख्यातनाम राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांबरोबर संशोधन - सहकार्य करार करून घेतला आहे. व उभयतांच्या मदतीने जागतिक स्तरावर आपला ठसा उमटविला आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने इयत्ता बारावी उत्तार्ण विदयार्थ्यांना लगेचच अर्थात बी. एस्सी. मध्येच विद्यापीठाच्या संशोधन तसेच अध्ययनपोषक वातावरणात आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या प्राध्यापक मागदर्शकच्या सानिध्यात, शिस्तीत शिकण्याची तसेच येथील संशोधनाच्या सर्व पायाभुत सुविधा वापरून त्यामध्ये प्राविण्य मिळविण्याची अमूल्य संधी दिली आहे. याच बरोबर विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीला चालना देण्यासाठी प्रोजेक्ट. बेसड्.लर्निंग, विविध कार्यशाळा, संशोधकांचे परिसंवाद, इत्यादींसारख्या उपक्रमांचेही उल्लेखनीय आयोजन येथे पाहायला मिळते. तसेच कला, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, विविध समाजाभिमुख उपक्रमांचंही आयोजन येथे वेळोवेळी केले जाते.

शिवाजी विद्यापिठाने, या अधिविभागाच्या माध्यमातून आपले वैश्विक मानदंड जागतिक पातळीवर पुन्हा एकदा प्रस्थापित केलेले आहे. राज्य तसेच केंद्रशासनासह विविध वित्तवितरक संस्थानांनी 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी' या अधिविभागास अर्थसाहाय्य करुन येथील नवनवीन संशोधनांस वारंवार चालना दिलेली आहे. शासनाच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानअंतर्गत या अधिविभागास 'सेंटर फॉर नॅनोफॅब्रीक्स' अशा आंतराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या उभारणी आणि संशोधन कार्यासाठी १.२४ कोटी रुपयांचे अनुदान मिळालेले असून लवकरच ही प्रयोगशाळा येथे सुरु होणार आहे.

स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी अधिविभागात विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या वैज्ञानिक तथा संशोधकांना वेळोवेळी पाचारण केले जाते. तसेच त्याचे व्याख्यान, परिसंवाद आणि चर्चासत्रही येथील विद्यार्थ्यांसाठी आयोजिले जातात. अधिविभागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील अत्यंत प्रतिष्ठीत अशा विद्यावेतनाबाबत जागरूकता, मार्गदर्शन तसेच आवेदनासाठी सहकार्यही येथील तज्ञ प्राध्यापक तसेच निर्मंत्रित तज्ञांमार्फत वेळोवेळी केले जाते. यांमध्ये जर्मनीच्या डाडा, हम्बोल्ट तर जपानच्या मेक्स्ट विद्यावेतनाचा समावेश आहे.

अधिविभागात बी. एस्सी. साठी प्रवेश घेतल्यानंतर पहिल्या वर्षांपासून येथील विद्यार्थ्यांना विज्ञानाधारीत मिनी प्रोजेक्टस् ;लघुप्रकल्प दिले जातात. त्यातून विद्यार्थ्यांच्या मनातला विज्ञानावरचा विश्वास, त्याची ओढ तसेच सृजनशिलता योग्यरित्या जोपासली जाते.

येथील विद्यार्थ्यांपैकी आजवर दोन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर (स्कॉटलंड व फ्रान्स येथे) आणि जवळजवळ ९० विद्यार्थ्यानी वेगवेगळ्या राष्ट्रीय संशोधन संस्थांमध्ये आपले संशोधन प्रकल्प पूर्ण केले असून तेथे इंटर्नशिपही यशस्वीरित्या पूर्ण केलेली आहे.

आजवर येथील जवळजवळ २५ विद्यार्थ्यांना स्कॉटलंड, फ्रान्स, युनायटेड किंगडम, कोरिया, तैवान, चीन, इस्राईल, इत्यादी देशांमध्ये संशोधनासाठी (पी.एच.डी.साठी) निवड झाली आहे. या काळात तिथे विद्यार्थ्यांना दरमहा ८०० ते १३०० अमेरिकन डॉलर्स अशा विद्यावेतनाचे आर्थिक सहाय्य उपलब्ध झालेले आहे.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत.)

पुढारी

# हक्कांसाठी अखेरपर्यंत नेटाने लढा : दमानिया



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना अंजली दमानिया. (छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कामगारांचे कायदे बदलले जात आहेत. सध्याचा काळ आव्हानात्मक आहे; पण कामगारांनी अजिबात खचायचे नाही. उलट आपल्या हक्कांसाठी नेटाने लढावे, असे आवाहन भ्रष्टाचारविरोधी चळवळीच्या कृतिशील नेत्या अंजली दमानिया यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम लिखित 'शिवज्योत' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आणि वसंतराव मगदूम यांचा अमृतमहोत्सवानिमित्त गौरव अशा संयुक्त कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दमानिया बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

दमानिया म्हणाल्या, २०११ पासून तत्त्वे आणि सिद्धांतांच्या मुद्द्यावर मी सामाजिक लढाई सुरू केली. राजकारण बदलण्यासाठी आम आदमी पक्षाची राज्य अध्यक्ष म्हणून सुरवातीला कार्यरत राहिले; पण काही गोष्टी खटकल्याने दोन पावले मागे येऊन पुन्हा भ्रष्टाचाराची लढाई सुरू ठेवली.

मगदूम म्हणाले, विद्यापीठात सेवक संघ आणि कर्मचारी संघ अशा दोन संघटना असल्या तरी माझे आणि सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांचे सबंध जिव्हाळ्याचे आहेत. फक्त आमचे लढण्याचे मार्ग वेगळे आहेत. प्र-कुलगुरू शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, नारायण पोवार, आदींसह सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांची उपस्थिती होती. कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी प्रास्ताविक केले. रेहाना मुरसल यांनी आभार मानले.

लोकमत

**अंजली दमानिया :** शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघातर्फे 'शिवज्योत'चे प्रकाशन

# प्रतिकार करणाऱ्यांची संख्या वाढली तरच भ्रष्टाचार संपेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भ्रष्टाचार फार वाढला आहे, असे बोलणारे समाजात अनेक लोक भेटतात; पण त्याला प्रतिकार करणारे फारच थोडे आहेत. भ्रष्टाचाराची प्रवृत्ती कायमची संपवायची तर वायफळ चर्चेपेक्षा त्याला प्रतिकार करणाऱ्यांची संख्या वाढली पाहिजे, अशी अपेक्षा भ्रष्टाचार निर्मूलन चळवळीच्या नेत्या अंजली दमानिया यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघातर्फे शुक्रवारी शाहू सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी कर्मचारी संघाचे वसंतराव मगदूम यांचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवज्योत व मानपत्र देऊन गौरव केला. मगदूम यांनी लिहिलेल्या 'कर्मचारी संघाची संघर्षमय यशस्वी वाटचाल,' 'शिवज्योत' या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात अंजली दमानिया यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, आदी उपस्थित होते.

दमानिया यांनी राजकीय पक्ष, निवडणुका, मतदारांची भूमिका सामाजिक चळवळीचे नेतृत्व आणि भ्रष्टाचार निर्मूलन या विषयांवर भाष्य करताना नागरिकांच्या सजगतेचे महत्त्व सांगितले. त्या म्हणाल्या, भ्रष्टाचार ही एक प्रवृत्ती आहे. ती नष्ट करण्यासाठी नुसती चर्चा करून, नाके मुरडून उपयोग नाही; तर तिला वैयक्तिक आणि संघटितपणे विरोध केला पाहिजे. भ्रष्टाचार निर्मूलनाचा लढा लढताना ही बाब प्रकर्षाने जाणवते. सामाजिक चळवळीचे नेतृत्व करताना चिकाटी व पाठपुरावा अत्यंत महत्त्वाचा आहे.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी वसंतराव मगदूम यांच्या कार्याचा गौरव करताना कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच प्रशासनाला धारेवर धरले. अनुकंपा, नोकरभरती, वेतनवाढ, आदी प्रश्नांवर त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. कर्मचाऱ्यांसाठी झोकून देऊन काम करणारे ते एकमेव आहेत, असे गौरवोद्गार काढले.

सत्काराला उत्तर देताना वसंतराव मगदूम यांनी, ७५ वर्षांच्या जीवनप्रवासात सेवक संघाचा कार्यकर्ता, नेता म्हणून कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांचे प्रश्न सोडविल्याचे समाधान वाटत असल्याचे सांगितले.

यावेळी कुलसचिव विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, मुख्य वित्त लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, कर्मचारी संघाचे बाबा सावंत, सुनील देसाई आदी उपस्थित होते.



## व्यक्तींना महत्त्व हवे

अलीकडे निवडणुकांमध्ये पक्ष बघून मतदान होण्याचे प्रमाण वाढले आहे. पक्ष हे निवडणुकीपुरतेच असतात; त्यामुळे पक्षांऐवजी व्यक्तींकडे बघून मतदान व्हावे, अशी अपेक्षा दमानिया यांनी व्यक्त केली.


योगाभ्यास
शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठाशी संलग्नित २९३ महाविद्यालयात योग



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित शिबिरात योगसाधना करताना नागरिक.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे यंदाचा योगदिन अधिक वैशिष्ट्यपूर्ण ठरला. शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि श्री सिद्धगिरी मठ, कणेरी यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी साडेसहा वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाने कणेरी मठाच्या सहकार्याने पहिल्या आंतरराष्ट्रीय योगदिनापासून विद्यापीठात दररोज सकाळी योग प्रशिक्षण शिबिर चालविले आहे. हे शिबिर सर्व समाज घटकांसाठी संपूर्णतः मोफत व मुक्त आहे. यामध्ये दररोज दोनशे साधक सहभागी होत असतात. या शिबिराचा पाचवा वर्धापनदिनही साजरा करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित २९३ महाविद्यालयांमध्येही आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

▶▶ पान २ वर